# अडगळीतलं प्रेम



pc: google pics rearranged by: #ashaagni

आर्टिस्ट रूपा देवधर त्यांची काव्ये, चित्रकला, फोटोग्राफी आणि लिखाणातून संवेदनशील व सर्जनशील व्यतिमत्व आहेत हे त्यांच्या चाहत्यांना नेहमीच जाणीव करून देतात. त्यांनी फेसबुकवर एक पोस्ट तीन चार दिवसांपूर्वी टाकली होती. आज मी ती वाचली आणि रूपा देवधर यांनी माझ्यातील काही गोठलेल्या विचारांना पुन्हा जागृत केले. समाजातील विविध स्तरांतील स्त्रिया आणि त्यांची मनःस्थिती ह्याचे दर्शन अनेक ठिकाणी होतच असते. रूपा देवधरांसारख्या हळुवार मनाच्या कलाकारांच्या नजरेतून हयावर तितक्याच कोमलतेने व्यक्त केले जाते हेही खरे.

माझ्यातील संवेदनशील व्यक्ती ह्या पोस्ट नंतर जागृत तर झाली. पण मला व्यक्तिशः कुठल्याही नातेसंबंधात 'क्लोजर' फार महत्वाचे वाटते. कदाचित रूपा देवधरांच्या ह्या काव्यातील 'प्रोटॉगनिस्ट' ची ही गरज आहे की नाही मला कल्पना नाही. पण एकविसाव्या शतकातील स्त्रीने तीच्या आयुष्यातील महत्वाच्या आणि आनंदाच्या क्षणांना वेळेवर अनुभवायचा तिचा अधिकार आहे आणि त्यासाठी तिनेच प्रयत्न केले पाहिजेत, ह्या भावनेतून मलाही काही पंक्ति सुचल्या आणि रूपा देवधरांच्या संमत्तीने दोघींची काव्ये ब्लॉगवर पोस्ट करत आहे. माझे काव्य रूपा देवधरांच्या काव्यानंतर सादर केले आहे. जरुर वेळ काढून वाचा आणि अभिप्राय कळवा. उपाय नाही पण 'आशावाद' स्त्रीने न सोडता 'क्लोजर' चा ध्यास ठेवला तर अनेक आनंदाचे क्षण अनुभवता येऊ शकतात असा समज. अर्थात 'आनंद कशात आहे?' हे व्यक्तीसापेक्ष आहे हे नक्की.

***आर्टिस्ट रूपा देवधर यांचे काव्य ।***

घराच्या बाहेर पडतो, तेव्हा समाजाचा एक उभा अख्खा स्तर बघायला मिळतो. प्रवासात, रेस्टॉरंटमध्ये, हॉस्पिटलमध्ये - समोर, इकडे तिकडे माणसं बसलेली असतात. काही न बोलता आपल्याला त्यांच्याबद्दल काहीतरी कळतं.

आणि मग कवयित्री नसलेल्या मला असं काहीतरी सुचतं.

………………………..

खिशात ठेवलेलं प्रेम!

…………….

तसं यांचं माझ्यावर खूप प्रेमे.

लग्न झालं तेवा मी बारावीलाच होते.

नवीन नवीन बाहेरून येताना माझ्यासाठी गजरा, भेळ, पिना काय काय आणायचे.

मी पण खूश होते.

मग पिंट्याच्या जन्मामुळं कॉलेज सुटलं म्हणा माझं.

पण यांचं प्रेम खूप.

तेवा एकदा सासूबाईंशी भांडले पण मला त्या घालून पाडून बोलतात म्हणून.

मला हसून म्हणायचे, – हे बघ प्रेम. शर्टाच्या वरच्या खिशातच ठेवलंय.

त्याला पण आता वीस वर्षं झाली म्हणा.

एकदा दोस्तांबरोबर तुळजापूर पंढरपूर करून आले.

मला काय जमलं नाई.

पिंट्याची शाळा होती.

शिवाय मला वेळ कुठे.

तरी पण माझ्यासाठी साडी आणली येताना.

प्रेम होतं खिशामध्ये.

नंतर तर थायलंडला दोस्तांबरोबर गेलते.

मी विमानात बसायला घाबरीन म्हणाले.

येताना माझ्यासाठी जीनची पँट आणली.

हसून हसून पुरेवाट झाली माझी.

मी कुठे घालणारे का जीनची पँट.

पण यांचं प्रेमे ना.

................

प्रेम आता कुठेतरी ठेवलेलं असतं.

ते अधून मधून हरवतं सुध्दा.

इतकी वर्षं झाली ना.

पसाऱ्यात असतं कुठेतरी.

मग ते सापडत नाही.

हे चिडतात.

मी वस्तू नीट ठेवत नाही, घर आवरत नाही म्हणतात.

जरा शिवीगाळ करतात.

मधूनच वस्तूंची फेकाफेक चालते.

माझ्या कानाखाली पण एखादी लावून देतात.

चालायचंच.

आपलंच माणूसे.

तसं यांचं प्रेमे माझ्यावर.

................

एखाद दिवशी चमत्कार होतो.

अडगळीत पडलेलं प्रेम यांना सापडतं.

कधीतरी दोन चार तुकडे झालेले असतात.

मग ते जोडून शर्टाच्या वरच्या खिशात ठेवून देतात.

छान दिसत राहतं सगळयांना.

परवा असंच सापडलं.

यांचे दोस्त यायचे होते जेवायला.

सगळयांना माझ्या हातची मटण भाकरी फार आवडते. दहा बारा दोस्त होते.

हे अगदी खूश झाले.

मटणावर.

मला थोडी शिवीगाळ झाली.

पण ठीके.

जेवणं संपायला बारा वाजून गेले.

मागचं आवरून, थाळ्या - ग्लासं धुवून मी हॉलमध्ये आले.

टीव्ही बघता बघता यांना झोप लागली होती.

तिथेच सोफ्यावर लवंडले होते.

वरच्या खिशात ठेवलेलं प्रेम कुठेतरी घरंगळून दिसेनासं झालं होतं.

सोफ्यापलीकडे पडलं असेल.

तसं मला झाडलोट करताना सापडेल म्हणा.

ठेवीन मग नीट उचलून.

……………

**रूपा देवधर.**

३१ मार्च २०२४

***मी आशा अग्निहोत्री वरील काव्यावर खालील प्रकारे व्यक्त झाले***.

सकाळ झाली

बाकीच्यांची झोपाझोप

सुरुच होती.

रविवार असल्याने,

रोजची घरघर कमी होती.

…….

काल खिशातलं प्रेम

परत एकदा निसटलं होत.

वाटलं तो उठण्यापूर्वी

आपणच शोधून काढावं.

.......

झाडलोट करताना,

जळमट चिकटलेली

गुंतवळ लडबडलेले,

कीती वर्षे निघुन गेली

याचे मोजमापही संपलेले.

.........

कुणाची झोपमोड न करता

त्याच्याच भवती शोधत राहावे.

कसेही जरी सापडले

तरी त्याच खिशात कोंबावे.

.........

पण नाहीच सापडले कुठे

कंटाळून नाद सोडून दिला.

वाटले एक मस्त चहा घ्यावा

उसनी मरगळ काढायला.

..........

चहासाठी दूध घ्यायला

फ्रिज उघडला.

हलकी गार हवा,

मोगऱ्याचा मंद सुगंध

.........

बहुतेक अडगळीतलं प्रेम

थंड करायला ठेवलं होत.

.........

वेड्या मनाने तेवढ्यात

उगाचाच दिवास्वप्न पाहिलं.

अलगद कवेत घ्यायला

बहुतेक तोच मागे उभा होता.

..........

हल्ली भान कुठ असत तुझं?

नेहमीच्या तोऱ्यात पुटपुटला,

‘तुझ्याबरोबर माझाही चहा टाक

मनःशांती हरवलीय,

माझा शोध सुरु आहे.’

...........

मनात होतं थंड झलेला सुगंधित गजरा

त्याच्या शर्टच्या वरच्या खिशात ठेवावा.

कालपर्यंतच सगळं विसरून

प्रेमाने खिसा काठोकाठ भरावा.

..........

पण आज का कुणास ठाऊक

गजरा मीच माझ्या हातात माळला.

शांतपणे चहाचे घोट घेत

मोगऱ्याच्या मंद सुगंधात,

त्याच अडगळीतल्या प्रेमाचा

अगदी वेगळ्याने अनुभव घेतला.

.........

**आर्किटेक्ट आशा अग्निहोत्री**

गुढीपाडवा, ९/४/२०२४

#ashaagni

https://ashaagni.wordpress.com/
@mazabageecha
@Wings Podcast by Milind Agnihotri ( season 4) (Spotify, Apple, You tube, Google, Amazon Music)
https://www.youtube.com/playlist?list=PL3RGrf1jAw2SRtTACqKL8b4gtyGvRwCUs